नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २०४<br>Issue - 204 | वार रविवार दि. १४ डिसेंबर २०२५<br>Blow- Sunday Date 14 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## ऐतिहासिक! ४५ वर्षे जुना किल्ला भाजपने भेदला

### मोदींसोबत सूर जुळलेल्या काँग्रेसी नेत्याच्या मतदारसंघात कमळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तिरुअनंतपुरम: केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप नं नेत्रदीपक यश मिळवलं आहे. भाजपनं केरळच्या राजधानीत कमळ फुलवलं आहे. तिरुअनंतपुरम नगरपालिका निवडणुकीत भाजपनं दणदणीत विजय मिळवला आहे. सोबतच ४५ वर्षांपासून लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंटच्या ताब्यात असलेला बालेकिल्ला भेदला. १०१ सदस्य असलेल्या तिरुअनंतपुरम नगरपालिकेत भाजप सगळ्यात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपनं आतापर्यंत ५० जागा जिंकल्या आहेत. सत्त-ाधारी एलडीएफला केवळ २९ जागा मिळाल्या आहेत.



तिरुअनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे दिग्गज नेते शशी थरुर निवडून येतात. २००९ पा-सून सलग चारवेळा ते इथून विजयी झाले आहेत. काँग्रेस च्या तिकिटावर निवडून येणाऱ्या थरुर यांचे सूर गेल्या वर्षभरापासून बदलले आहेत. ऑपरेशन सिंदूरचं त्यांनी तोंड भरुन कौतुक केलं. या ऑपरेशननंतर मोदी सरकारनं जगा-तील विविध देशांमध्ये शिष्टमंडळं पाठवली. यातील अमेरिकेला गेलेल्या शिष्टमंडळाचं नेतृत्व थरुर यांनी केलं. हा निर्णय काँग्रेस श्रेष्ठींना पसंत पडला नव्हता. पण तरीही थरुर अमेरिकेला गेले. त्यांनी मोदी यांचं अनेकदा कौतुक केलं आहे.

तिरुअनंतपुरममधील विजयानं भाजप कार्यकर्ते आनंदले आहेत. या नगरपालिकेत डाव्यांचा दबदबा होता. काँग्रेसच्या नेतृत्त्वातील यूडीएफ विरोधात होता. काँग्रेसनं एलडीएफसह यूडीएफला मागे टाकत सरशी साधली. एनडीएनं तिरुअनंतपुरम नगरपालिकेत १०१ पैकी ५२ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं. सत्ताधारी एलडीएफला २९, तर यूडीएफला १९ जागा मिळाल्या.

शशी थरुर यांच्या मतदारसंघात भाजपची एन्ट्री झालेली आहे. या विजयाबद्दल थरुर यांनी भाजपचं अभिनंदन केलं आहे. भाजपचा विजय ऐतिहासिक असल्याचं थरुर यांनी म्हटलं आहे. हा केवळ भाजपचा विजय नाही, तर लोकशाहीचा विजय असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. विशेष म्हणजे थरुर गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसच्या नेतृत्त्वापासून दूर गेले आहेत. दुसरीकडे ते मोदींच्या जवळ आहेत. रशियाचे अध्यक्ष पुतीन गेल्याच आठवड्यात भारतात येऊन गेले होते. तेव्हा त्यांच्यासाठी आयोजित डिनरला विरोधी पक्षनेते रा-हुल गांधींना आमंत्रण नव्हतं. पण थरुर यांना निमंत्रित करण्यात आलं होतं.

## सगळा महाराष्ट्र लुटून झाला, आता बाजार समित्या तरी शिल्लक ठेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : आज विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील ८० हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त उलाढाल करणाऱ्या महत्त्वाच्या बाजार समिती अध्यक्षपदी मंत्री आणि उपाध्यक्षपदी राज्यमंत्री तर सदस्य म्हणून काही आयएएस अधिकारी व दोन ते तीन शेतकरी प्रतिनिधी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सरकारवर सडकून टीका केली.

सगळा महाराष्ट्र लुटून झाला आता शेतकऱ्यांच्या बाजार समिती तरी शिल्लक ठेवा असे शेट्टी म्हणा-ले. इथेही लुटता यावे म्हणून मंत्री राज्यमंत्री नेमता काय? असा सवाल त्यांनी केला. यात आयएएस अधिकाऱ्यांचे आम्ही स्वागत करू मात्र मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे इथे काय काम अशी टीका त्यांनी केली. जर मंथनियन राज्यमंत्री नेमत असेल तर शेतकऱ्यांनी मते देऊन निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे काय असा सवाल करताना बाजार समिती या चराऊ कुरणे आहेत. त्यात फक्त चरण्याचा अधिकार या



**सरकारच्या 'त्या' निर्णयावरुन राजू शेट्टींची मुख्यमंत्र्यांवर सडकून टीका**

पांढऱ्या हत्ती सारख्या पोसलेल्या मंत्र्यांचा आहे का ? असा संतप्त सवालही त्यांनी केला. सरकारने या घेतलेल्या निर्णयाचा आम्ही जाहीर निषेध करत असल्याचेही राजू शेट्टी यांनी सांगितले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्वात मोठे ब्लॅकमेलर असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. गेल्या सहा दिवसापासून पंढरपूर तालुक्यातील वाखरी इथंऊस दरासाठी सुरु असले-ले आमरण उपोषण राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांच्या उप-स्थितीत सुटले. यानतर बोलताना राजू शेट्टींनी सरकारवर टीका केली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १५ रुपये द्या नाहीतर काटामारी बाहेर काढू असे म्हणणारे मुख्यमंत्री हेच सर्वात मोठे ब्लॅकमेलर असल्याचे शेट्टी म्हणा-ले. ऊसाला पहिली उचल साडेतीन हजार रुपये मिळावी यासाठी गेल्या सहा दिवसापासून समाधान फाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वाख-री येते आमरण उपोषण सुरू केले होते. आज जिल्ह्यातील १५ पेक्षा जास्त साखर कारखान्यांनी पहिली उचल तीन हजार रुपये देण्याचे जाहीर केल्यानंतर राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांनी आंदोलकांना लिंबू पाणी देत त्यांचे आमरण उपोषण सोडवले. यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री आणि सरकारवर सडकून टीका केली.

## ... तर उद्या मुख्य सचिवांवर हक्कभंग प्रस्ताव आणणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या विधीमंडळाचे अधिवेशन संपत आले तरी सदस्यांनी मांडलेल्या अनेक लक्ष्यवेधी सूचनांची उत्तर अद्याप प्रलंबित आहेत. त्यावरुनच भाजपचे आमदार सुधीम मुनगंटीवारांनी चिंता व्यक्त केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनीही त्याला प्रतिसाद देत कारवाईचा इशारा दिला. उद्या सभागृहाची बैठक संपेपर्यंत जर लक्ष्यवेधींची प्रलंबित उत्तरं दिली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाचा प्रस्ताव आणला जाईल असा इशारा राहुल नार्वेकरांनी दिला.



**सुधीर मुनगंटीवारांच्या मुद्द्यावर राहुल नार्वेकरांचा इशारा**

माजी मंत्री आणि भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवारांनी लक्ष्यवेधींच्या प्रलंबित मुद्द्यांचा प्रश्न सभागृहात मांडला. काही लक्ष्यवेधी या सभागृहात मांडल्या जातात तर काही लक्ष्यवेधींची उत्तरं ही शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात अशी प्रथा आहे. पण गेल्या काही अधिवेशनापासून ही प्रथा दिसत नाही असं सुधीर मुनगंटीवारांनी निदर्शनास आणून दिलं.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, विधानसभा अध्यक्षांनी या आधी ३० सप्टेंबर रोजी मुख्य सचिवांना एक पत्र लिहिलं होतं. त्यानुसार १२९ लक्ष्यवेधी सूचनांची निवेदनं प्राप्त आहेत. ३२९ स्वीकृत लक्ष्यवेधींपैकी २९२ निवेदनं प्राप्त आहेत. उर्वरित लक्ष्यवेधींची उत्तरं देण्यात आली नाहीत.

सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या मुद्द्यावर बोल-ताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, सुधीर मुनगंटीवारांनी मांडलेला मुद्दा अगदी योग्य आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला जर असं वाटत असेल की विधीमंडळाच्या पीठासन अधिकाऱ्याने जर दिलेले निर्देश पाळणे बंधनकारक नाही, तर त्यावर कारवाई केली जाईल. उद्या सभागृहाची बैठक संपेपर्यंत जर सभागृहाच्या पटलावर प्रलंबित लक्ष्यवेधींची उत्तरं आली नाहीत तर मुख्य सचिवांवर हक्कभंगाची कारवाई केली जाईल.

## कोलकातामधील मेस्सीच्या कार्यक्रमात अभूतपूर्व राडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : साल्ट लेक स्टेडियमवर झालेल्या लिओ-नेल मेस्सीच्या फुटबॉल कॉन्सर्टचे मुख्य आयोजक सताद्रु दत्ता यांना पोलिसांनी अटक केली आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडा झाल्यानंतर, अर्जे टिनाचा विश्वचषक विजेता कर्णधार लिओनेल मेस्सीला कार्यक्रमाचे ठिकाण सोडून लवकर परतण्यास भाग पाडल्यानंतर पोलिसांनी हे पाऊल उचलले आहे. कार्यक्रमाच्या गैरव्यवस्थापनाच्या आरोपाखाली दत्ता यांना कोलकाता विमानतळावर अटक करण्यात आली, जिथे ते मेस्सी आणि इतरांना हैदराबादला जाण्यासाठी निरोप देण्यासाठी गेला होते. पश्चिम बंगालचे पोलिस महासंचालक (डीजीपी) राजीव कुमार यांनी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल. प्रेक्षकांना त्यांचे तिकिट परत मिळावेत असेही त्यांनी सांगितले.


संपूर्ण कोलकाता मेस्सीच्या स्वागतात मग्न होता. पण जसजसा दिवस पुढे सरकत गेला तसतसे परिस्थिती बदलत गेली. साल्ट लेक स्टेडियमवर अभूतपूर्व गोंधळ उडाला. तिकिटे खरेदी करण्यासाठी हजारो रुपये खर्च करूनही, अनेक चाहते त्यांच्या आवडत्या खेळाडूला पाहू शकले नाहीत. मेस्सी देखील नियोजित वेळेपूर्वी मैदान सोडून गेला. यामुळे मेस्सीच्या चाहत्यांचा संताप वाढला आणि स्टेडियम युद्धभूमी बनले. बाटल्या फेकण्यात आल्या, खुर्च्या फेकण्यात आल्या

**थेट आयोजकांना बेड्या ठोकल्या, प्रेक्षकांचे पैसे सुद्धा परत करणार!**

आणि शेकडो लोक कुंपण तोडून मैदानात घुसले. स्टेडियमला

आगही लावली. पोलिसांनी लाठीमार केला, पण परिस्थिती नियंत्रणात आली नाही. सुरक्षा कर्मचारी असहाय्य दिसत होते. अखेर मुख्य आयोजक सतद्रु दत्ता यांना अटक केल्याने चाहत्यांचा राग काहीसा कमी झाला आहे.

या घटनेनंतर राज्य पोलिस महासंचालक राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांच्यासोबत एडीजी कायदा आणि सुव्यवस्था जावेद शमीम होते. राजीव कुमार म्हणाले की सरकारने चौकशीसाठी एक समिती स्थापन केली आहे आणि आयोजकांकडून लेखी उत्तर मागितले आहे. त्यांनी विकलेल्या तिकिटांचे पैसे परत करावेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल. मेस्सी पाहता न आल्याने संतापाची लाट पसरली. मुख्य आयोजकाला ताब्यात घेण्यात आले आहे; कोणालाही सोडले जाणार नाही. जावेद शमीम म्हणाले की एफआयआर दाखल केला जात आहे. आयोजकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. त्यांनी पुढे सांगितले की तपासानंतरच दोषी निश्चित केले जातील, ज्याला थोडा वेळ ला-गेल. फसवणूक झालेल्या आणि संतप्त झालेल्या मेस्सी चाहत्यांच्या चिंता दूर केल्या जात आहेत.



दरम्यान, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकाता येथे झालेल्या फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या कार्यक्रमातील गैरव्यवस्थापनाबद्दल नाराजी व्यक्त केली. या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली. ममता बॅनर्जी म्हणाल्या की त्या साल्ट लेक स्टेडियमवर मेस्सीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जात होत्या, जिथे हजारो चाहते प्रसिद्ध फुटबॉलपटूची एक झलक पाहण्यासाठी जमले होते. एक्स वरील एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, या दुर्दैवी घटनेबद्दल मी लिओनेल मेस्सी, त्यांचे चाहते आणि सर्व क्रीडाप्रेमींची नम्रपणे माफी मागते.

ममता बॅनर्जी म्हणाल्या की त्या न्यायमूर्ती (निवृत्त) असीम कुमार रे यांच्या नेतृत्वाखाली एक चौकशी समिती स्थापन करत आहेत. गृह विभागाचे मुख्य सचिव आणि पर्वतीय व्यवहार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव या समितीचे सदस्य असतील.

समिती या घटनेची सविस्तर चौकशी करेल, जबाबदारी निश्चित करेल आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना सु-चवेल. ममता म्हणाल्या, पुन्हा एकदा, मी सर्व क्रीडाप्रेमींची मना-पासून माफी मागते.

### राज्यातील शेतकरी नेते निघाले पंढरपूरकडे

### आंदोलनानंतर कारखानदार आले गुडघ्यावर

## सोलापूर जिल्ह्यात ऊस आंदोलनाचा भडका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कडाक्याच्या थंडीत सोलापूर जिल्ह्यात ऊस दराचे आंदोलन भडकू लागले असून आमरण उपो-षणाला बसलेले समाधान फाटे यांची तब्येत आज सहाव्या दिवशी अत्यंत खालावल्याने आता राज्यातील शेतकरी नेते पंढरपूरकडे निघाले आहे. ऊसाला साडेतीन हजार रुपये पहिला हप्ता मिळावा, या मागणीसाठी गेले सहा दिवसापासून समाधान फाटे आणि त्यांचे तीन सहकारी वाखरी पालखीतळावर आमरण उपोषणाला बसले आहेत.

दरम्यान, सहाव्या दिवशी त्यांची तब्येत खूपच नाजूक झाली असून त्यांनी उपचार घेणे आज पासून थांबवली आहे. यामुळे आता जिल्ह्यातील एकही साखर कारखाना चालू न देण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ऊस शेजारील सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर आणि पुणे जिल्ह्यात निरा भिमा सारख्या कारखान्यांना जाऊ लागल्याने तेथे त्याला पहिली उचल साडेतीन हजार रुपये मिळू लागली आहे.

यामुळे संतप्त होऊन शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पहिल्या दिवशी सीताराम आणि पांडुरंग सहकारी साखर कारखाना बंद पाडल्यावर दोन्ही ठिकाणी पहिली उचल वाढवून तीन हजार रुपये देण्यात आली आहे. या दोन ठिकाणी कारखाने बंद पडतात आंदोलनाच्या भीतीने बबनराव शिंदे यांनी त्यांच्या दोन्ही कारखान्यावर आणि आमदार अभिजीत पाटील यांनी त्यांच्या विठ्ठल कारखान्यावर तातडीने ३००० पेक्षा जास्त उचल घोषित केली आहे.

शेजारच्या जिल्ह्यातील कारखान्यांना एवढी लांब वाहतूक करून जर साडेतीन हजार रुपये दर परवडत असेल तर तुम्ही काय टनामागे हजार रुपये खाणार का? असा संसप्त सवाल आंदोलन समाधान पाटील यांनी केला आहे. साखर सम्राटांकडे नवीन कारखाने विकत घेण्यात पैसा आहे, असे सांगत बोत्रे पाटील यांचे ३१ कारखाने बबनदादा शिंदे यांचे सहा अभिजीत पाटील यांचे सहा दोन सीजन करून काळुंगे यांनी तीन कारखाने केल्याचा आरोप फाटे यांनी केला आहे.

दरम्यान आता फाट्यांची तब्येत नाजूक बनत चालली असताना शास-नाने तातडीने यात हस्तक्षेप न केल्यास जिल्ह्यातील या आंदोलनाचा भडका राज्यभर पोहोचेल, असा इशारा शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला असून दर न देण्यासाठी तुम्ही जर कारखानदारी एक येत असाल तर आता आम्ही शेतकऱ्यांचा दर मिळवण्यासाठी सर्व संघटना एकत्र आल्याचा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

फाटे यांची तब्येत गंभीर बनली असून शासन आणि प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप न केल्यास आज राज्याचे नेते येथे पोचत असून या आंदोलनाचा भडका राज्यभर उडू शकेल असा इशाराही दिला आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या उपोषणाची सांगता

## मंत्री प्रसाद लोढा यांनी उपोषणस्थळी येऊन सोडवले आंदोलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पत्रकार व पत्रकारितेशी संबंधित ३३ मागण्यांसाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया' आणि 'व्ही. ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने नागपूरच्या यशवंत स्टेडियम येथे सुरू असलेले उपोषण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थी व आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. मंत्री प्रसाद लोढा यांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देत उपोषणाची सांगता केली.

अधिवेशन सुरू झाल्यापासून 'व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम'च्या वतीने हे उपोषण सुरू होते. १५ व १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शिखर अधिवेशनात वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओ आणि डिजिटल मीडियासंदर्भातील ३३ मागण्यांचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले होते. या ठरावांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी संपूर्ण पदाधिकारी साखळी उपोषणावर बसली होती.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मागील चार दिवसांत उपोषणस्थळी अनेक मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये १० आमदार, ३ खासदार आणि ४ माजी मंत्र्यांचा समावेश होता. संघटनेने पत्रकार व पत्रकारितेसाठी केलेले कार्य सरकारपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन प्रत्येक भेट देणाऱ्या मान्यवरांनी दिले.

दरम्यान, माजी मंत्री तथा कॅबिनेट मंत्री प्रसाद लोढा हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दूत म्हणून उपोषणस्थळी आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला हे उपोषण सोडवण्यासाठी पाठवले आहे. आपल्या मागण्या मान्य केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने दिले. 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने चौथा स्तंभ

### मागण्यांचा जीआर निघेपर्यंत लढा सुरूच राहणार : संदीप काळे

मजबूत करण्यासाठी केलेले कार्य नोंद घेण्यासारखे असून, संघटनेने असेच काम पुढे सुरू ठेवावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

यानंतर मंत्री लोढा यांच्या हस्ते 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, विश्वस्त व महाराष्ट्र समन्वयक किशोर कारंजेकर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अनिल मस्के, नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे आणि राज्य कोअर कमिटीचे प्रमुख कल्पेश महाले यांना ज्यूस देऊन उपोषणाची अधिकृत सांगता करण्यात आली.

यावेळी बोलताना संदीप काळे म्हणाले की, संपूर्ण प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून, मुख्यमंत्र्यांनी सर्व मागण्या मान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन सविस्तर भूमिका मांडली जाईल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, जोपर्यंत मागण्यांचा शासन निर्णय (GR) निघत नाही, तोपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

उपोषणाच्या सांगतेवेळी 'व्हॉईस ऑफ मीडिया जिंदाबाद'च्या घोषणांनी यशवंत स्टेडियम परिसर दणाणून गेला. आंदोलनात सहभागी सर्व पदाधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह दिसत होता. पत्रकारांनी पत्रकारितेसाठी उभा केलेला हा लढा महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अक्कलकोट येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना आदरांजली




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : स्व. गोपीनाथ मुंडे अमर रहे रहे! अमर रहे! अशी घोषणा देत अक्कलकोट येथे गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा परमेश्वर आरबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना आदरांजली वाहण्यात आली.

गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष प्रा.परमेश्वर आरबाळे प्रतिष्ठानचे सचिव नवनाथ धस यांच्या वतीने अक्कलकोट येथे मंगरूळे बायपास चौकात स्व.गोपीनाथ मुंडे यांना श्रद्धांजली. यावेळी प्राध्यापक परमेश्वर आरबळे यांनी मुंडे साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला .यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, काशिनाथ गळगेरगी, बसवराज बिराजदार, भाजपाचे माजी चिटणीस दयानंद बिडवे, कांबळे, माजी नगरसेवक काशिनाथ घोडके, अडत व्यापारी विजयकुमार बिराजदार आदी जण उपस्थित होते.

# सर्व वित्तीय निकष पाळूनच निधीची तरतूद; नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : खर्चावर कठोर नियंत्रण, काटेकोर आर्थिक शिस्त, संसाधनांचा जास्तीत जास्त वापर आणि नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. जीएसटी, उत्पादन शुल्कसह खनिकर्म विभागांद्वारे राज्याचा महसूल वाढविण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. कोणताही वित्तीय निर्देशांक बिघडू न देता राज्याचा विकास वेगात ठेवणे हे आमचे धोरण आहे. राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेत सर्व वित्तीय निकषांचे काटेकोरपणे पालन करुनच निधीचे वाटप करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांवर सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, हिवाळी अधिवेशनात एकूण ७५ हजार २८६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या असून यातील ३८ हजार ६०० कोटींचा निधी केवळ जनकल्याण योजनांसाठी व केंद्राच्या हिस्स्यासाठीच्या आहेत. यामध्ये पूरग्रस्त शेतकरी मदत, बळीराजा वीज सवलत, सिंहस्थ कुंभमेळा, महात्मा फुले जनआरोग्य योजना, संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनांसाठी वाढीव तरतुदींचा समावेश आहे. केंद्र सरकारकडून १० हजार ६०० कोटी मिळणार असून राज्यावर येणारा निव्वळ वित्तीय भार ६४ हजार ६०० कोटी रुपयांचा आहे.

राज्याच्या कर्जस्थितीबाबत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, वित्त आयोगाने घालून दिलेल्या निकषांनुसार राज्याचे काम सुरु आहे. वर्ष अखेरीस खर्चावर नियंत्रण ठेवून व आर्थिक शिस्त पाळून वित्तीय निर्देशांकांचे पालन करण्यात राज्य शासन नेहमीच यशस्वी झाले आहे. चालू वर्षी देखील पुरवणी मागण्यांमधून तरतूद केली असली तरी उत्पन्नाचे नवीन स्त्रोत तयार करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. वस्तू व सेवाकर (जीएसटी), उत्पादन शुल्क आणि खनिकर्म या विभागाद्वारे मिळणारा महसूल वाढविण्याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. याशिवाय संसाधनाच्या क्षमतेचा पूर्ण वापर करुन तसेच वित्तीय शिस्त लावून सुधारित अंदाजातून राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या मर्यादेत राहील, याची दक्षता घेण्यात येईल, असे नमूद करुन राज्याची वित्तीय शिस्त कुठेही बिघडली नसल्याचा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला.

# राज्यात आरोग्यसेवा अधिक सक्षम; आयुष्मान भारत-महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोठ्या सुधारणा लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि पूर्णपणे कॅशलेस आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या एकत्रित अंमलबजावणीत राज्य सरकारने जानेवारी २०२५ पासून महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या सुधारणा आरोग्यव्यवस्थेतील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा गुणवत्तेत मोठी वाढ घडवून आणतील, असा विश्वास आहे.

**उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत**

योजनेत उपलब्ध उपचार पॅकेजेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. यामुळे अधिक आजारांचे उपचार कॅशलेस पद्धतीने उपलब्ध होणार असून ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो रुग्णांना याचा थेट लाभ मिळणार आहे.

**रुग्णालयांसाठी वाढीव दर आणि सुधारित पॅकेजेस**

योजनेअंतर्गत रुग्णालयांना मिळणारे उपचार दर वाढवण्यात आले आहेत. पॅकेजेसचे पुनर्मुल्यांकन करून अनेक उपचारांसाठी अधिक शुल्क मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे रुग्णालयांना सेवा अधिक सक्षमपणे देणे शक्य होणार आहे.

**गुणवत्तेला प्राधान्य - १० टक्के ते १५ टक्के प्रोत्साहन रक्कम**

एनएबीएच व एनक्यूएएस गुणवत्ता मानके पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांसाठी दावा रकमेच्या वर अतिरिक्त १० टक्के ते १५ टक्के प्रोत्साहन देण्याचा निर्णय झाला आहे. यामुळे रुग्णालयांना उच्च दर्जाचे उपचार देण्यास प्रोत्साहन मिळेल.

**जिल्हास्तरीय समित्या कार्यान्वित**

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण आणि तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. या समित्यांमुळे निरीक्षण, तक्रार निवारण आणि धोरणात्मक मार्गदर्शन अधिक मजबूत होणार आहे.

**२४ तास कार्यरत कॉल सेंटर**

योजनेविषयी माहिती आणि तक्रार निवारणासाठी नागरिकांसाठी २४ तास कार्यरत असलेले - १५५३८८ / १८००२३३२२०० आणि १४५५५ / १८००१११५६५. हे टोल-फ्री क्रमांक उपलब्ध आहेत

**प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात 'किऑस्क' व आरोग्यमित्र**

रुग्णालयांना दर्शनी भागात योजना कक्ष (किऑस्क) उभारणे बंधनकारक असून रुग्णांना मार्गदर्शन करण्यासाठी आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले आहेत. यामुळे उपचारप्रक्रियेत पारदर्शकता व रुग्णसुलभता वाढणार आहे.

**तक्रार नोंदणी व कारवाईची काटेकोर व्यवस्था**

उपचार नाकारणे, रुग्णांकडून अवैध शुल्क मागणे किंवा कॅशलेस सेवा न देणे अशा तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याची जबाबदारी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक, अंमलबजावणी सहाय्य संस्थांचे अधिकारी आणि जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे. तक्रार सिद्ध झाल्यास रुग्णाकडून घेतलेली रक्कम परत करणे, दंड आकारणे, तसेच रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करणे किंवा निलंबन अशी कडक कारवाई राज्य आरोग्य हमी सोसायटी करत आहे.

**उपचार पूर्णपणे कॅशलेस; कोणतेही अतिरिक्त शुल्क मान्य नाही**

योजनेअंतर्गत रुग्णांना शस्त्रक्रिया, तपासण्या, इम्प्लांट्स, औषधे, जेवण व एकवेळचे प्रवासभाडे या सर्व सुविधा पूर्णपणे कॅशलेस देणे रुग्णालयांसाठी बंधनकारक आहे. रुग्णांकडून कोणतेही शुल्क आकारणे नियमबाह्य आहे.

राज्यातील सर्व अधिवासी नागरिक पात्र-एकत्रित योजना राज्यातील सर्व अधिवासी नागरिकांसाठी लागू असून त्यांना दिलेल्या लाभांविषयी जागरूक राहावे, असे आवाहन सरकारने केले आहे. उपचार नाकारल्यास नागरिकांनी आरोग्यमित्र, जिल्हा अधिकारी, तक्रार निवारण समिती किंवा राज्य आरोग्य हमी सोसायटीशी त्वरित संपर्क साधावा, असेही स्पष्ट केले आहे.

## सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देणेकामी गठीत जिल्हास्तरीय समितीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हयातील सैनिक,माजी सैनिक यांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे अध्यक्षतेखाली १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे दालनात जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

तरी सोलापूर जिल्हयातील सर्व सैनिक,माजी सैनिकांनी आपल्या अडीअडचणी विषयक संपूर्ण दस्तावेज दोन प्रतीमध्ये घेऊन पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे दालनात सकाळी ११.३० पर्यंत उपस्थित राहावे असे, आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

'वैनतेय'च्या चिमुकल्यांचा ऊर्जा बचतीचा अनोखा उपक्रम

'राष्ट्रिय ऊर्जा संवर्धन दिन' विशेष

# आम्ही आमचे वीज बिल कमी केलं...आणि तुम्ही?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : ऊर्जा बचत करण्याचे महत्व नागरिकांना पटवून देणे, ऊर्जेच्या कार्यक्षमतेबद्दल जनजागृती करणे या उद्देशाने १४ डिसेंबर हा 'राष्ट्रिय ऊर्जा संवर्धन दिन' म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने ऊर्जा बचत व पर्यावरण रक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी वीजबील कमी करून 'मी ऊर्जावीर' हा उपक्रम यशस्वीपणे राबविला.❊

> **वीजेची बचत काळाची गरज बनली आहे. मागणीपेक्षा पुरवठा कमी असल्याने नागरीकांना भारनियमनाचा सामना करावा लागत आहे. घरातील वीज उपकरणांच्या वापरावर नियंत्रण ठेवून विजेच्या बीलात केलेली बचत म्हणजे चिमुकल्यांनी ऊर्जा बचतीत केलेला खारीचा वाटाच म्हणावा लागेल. ऊर्जा बचतीच्या जनजागृतीसाठी राबविलेला हा उपक्रम कौतुकास पात्र आहे.**
>
> **- वि. दा. व्यवहारे** (अध्यक्ष न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड)

दर महिन्याला येणाऱ्या वीजबिलातील वापर केलेल्या वीज युनीट पेक्षा पुढील महिन्याच्या बीलात सर्वात जास्त वीज युनीट बचत केलेल्या विद्यार्थ्यांचा 'मी ऊर्जावीर' असा सन्मान करण्याचा हा उपक्रम आहे. घरातील अनावश्यक वीजेची उपकरणे बंद करून वीजेची बचत करून आपले लाईट बील सर्वात कमी करण्याच्या उपक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

वीजेची बचत काळाची गरज, सौरऊर्जेचा वापर करा, एलईडी चा वापर करा, वीजेची बचत म्हणजेच वीजेची निर्मिती, मी वीज वाचवणारच, ऊर्जा वाचवा देश वाचवा यांसारख्या घोषणाफलकांतून विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.

सूर्य, वारा, पाणी यांसारख्या अक्षय ऊर्जास्त्रोतांची माहिती देत ऊर्जा बचतीची जनजागृती साठी राबविलेल्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी लता भरसट,कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता आहिरे, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

**वीज बचतीसाठी हे कराच...**

गरज नसताना दिवे पंखे, टि.व्ही. व विजेची इतर उपकरणे बंद ठेवा.

ऊर्जेची बचत करणारी फाईव्ह स्टार रेटींगची उपकरणे वापरण्यावर भर द्या.

सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर करा.

एलईडी सारख्या पर्यायांचा वापर करा.

सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा वापर करा.

काम करतांना संगणक पूर्ण बंद ठेवा, तो 'स्टॅण्डबाय' वर ठेवू नका.

फ्रीज वारंवार उघडू नका.

मोबाईल चार्ज झाल्यानंतर मुख्य बटन बंद करा.

गावी निघण्यापूर्वी सर्व बटन बंद केल्याची खात्री करा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

### राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत

# मालमत्ता, पाणीपट्टी करात ५० टक्के सवलत

## गोगांव ग्रामपंचायतीकडून नागरिकांना लाभ घेण्याचे सरपंच वनिता सुरवसे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत, चालू वर्षाच्या करासह थकबाकीची ५०% रक्कम एकाच वेळी भरल्यास, निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५०% सवलत मिळणार आहे. त्याच अनुषंगाने अक्कलकोट तालुक्यातील

गोगांव ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत नागरिकांना मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करामध्ये ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. ही सवलत फक्त अभियान कालावधीत म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत लागू असणार आहे. योजनेनुसार, ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती कराच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत दिली जाईल. नागरिकांना चालू २०२५-२६ या वर्षाचा पूर्ण कर एकरकमी भरावा लागणार आहे. तसेच १ एप्रिलपूर्वीची थकबाकी भरता ५० टक्के सवलत लागू होईल. मात्र, थकबाकीवरील सवलतीची उर्वरित रक्कमही एकरकमीच भरावी लागणार असल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे. या योजनेला प्रतिसाद मिळत असून नागरिकांनी थकबाकी व चालू वर्षाचा कर भरून सवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे.तर या निवासी मालमत्ताधारकांना पाणी पट्टी आणि घरपट्टीच्या थकबाकीत ५०% सवलत मिळण्याचे आवाहन गोगांव ग्रामपंचायतिच्या सरपंच वनिता सुरवसे यांनी केले आहे अधिक माहितीसाठी ग्रामपंचायत अधिकारी विक्रम घाटे यांच्याशी संपर्क साधावे असे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले आहे.



# प्रचंड मोठ्या मोर्चाच्या माध्यमातून गृहराज्यमंत्री यांना पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/ प्रतिनिधी

प्रचंड मोठ्या मोर्चाच्या माध्यमातून गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना पोलीस पाटलांच्या विविध मागण्या चे निवेदन सादर करण्यात आले.

नागपूर येथे काढण्यात आलेल्या मोर्चासाठी सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, मोहोळ,बार्शी, मंगळवेढा, पंढरपूर,करमाळा, दक्षिण सोलापूर , उत्तर सोलापूर,माढा इत्यादी तालुक्या मधुन ४०० पोलीस पाटील उपस्थित होते.

पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची भेट घेऊन पोलीस पाटलांच्या विविध मागण्या चे दिवेदन देण्यात आले निवेदन वाचून कदम साहेब पोलीस पाटील संघटनेच्या पदाधिकारी यांना मानधन वेळेवर होण्याबाबत तसेच पोलीस पाटलांना लावल्या जाणाऱ्या वाळू दिवट्या रद्द करण्याबाबत तसेच प्रवास भत्ता दुप्पट करण्याबाबत अनुकंप कायदा लागू करण्याबाबत दर महिन्याला मानधन वेळेवर मिळण्याबाबत एक रक्कम सेवानिवृत्तीनंतर २० लाख रुपये मिळणे बाबत इत्यादी विषयावर अधिवेशन संपल्यानंतर दहा दिवसांमध्ये पोलीस पाटलांबरोबर बैठक लावण्याच्या आश्वासन दिले ,



**अक्कलकोट तालुकाध्यक्ष रहिमान अत्तार यांची माहिती**

यावेळी पोलीस पाटील संघटनेचे राज्याध्यक्ष दिलीप पाटील राजीव उपाध्यक्ष प्रशांत पाटील प्रसिद्धीप्रमुख तोफिक शेख जिल्हाध्यक्ष अँड. नानासाहेब शिंदे, सिद्धार्थ कोळी अँड. गणेश खटकाळे, रहिमान अत्तार, विजय वाघमारे ,सुनील वाघमारे ,ज्ञानेश्वर नागणे, शशांक गवळी, औदुंबर बुधावले,बालाजी शेगर,संघपाल दणाने, आण्णा सुतार,रेणुका इंगळे, सुमित्रा सुरवसे,महादेवी पाटील,वैशाली मोरे, विजय बावकर, योगेश जाधव,श्रीशैल बिराजदार,भिमण्णा म्हेत्रे, शैलेंद्र नडगम, महेश कोरले,श्रीशैल पाटील,मोहन वाघमोडे,आदीसह राज्यातील पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते

### नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२५ च्या अनुषंगाने

# मतदान व मतमोजणीच्या दिवशी आठवडा बाजार बंद ठेवण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ दि. ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्राप्त निर्देशानुसार मतदाना दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करुन मतदान प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सार्वत्रिक नगरपरिषद , नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या जाहीर कार्यक्रमानुसार सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील मतदान २० डिसेंबर २०२५ व मतमोजनी २१ डिसेंबर २०२५ रोजी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे यास अनुसरुन सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मतदाना दिवशी वार शनिवार २० डिसेंबर २०२५ व मतमोजनी दिवशी वार रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी नमुद नगरपरिषद / नगरपंचायत हद्दीतील आठवडा बाजार भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

यामध्ये बार्शी येथील आठवडा बाजार शनिवारी तसेच सांगोला व मोहोळ येथील आठवडा बाजार रविवारी भरविण्यात येतो.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, कलम ३७(३) व दि. मार्केट अॅण्ड फेअर अॅक्ट १८६२ मधील कलम ५ (ग) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी सोलापूर यांनी आदेश दिले आहेत की, सार्वत्रिक नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने मतदान केंद्राच्या परिसरात सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी खालील नगरपरिषद / नगरपंचायत हद्दीतील आठवडा बाजार २० डिसेंबर २०२५ व मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी असल्याने सदर आठवडा बाजार भरविण्यास मनाई करण्यात आली आहे.

# नियोजित रिटेवाडी उपसा चिंचवड योजनेच्या सर्वेक्षणासह मंजुरीसाठी आमदार नारायण आबा पाटील यांनी घेतले जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

तालुका करमाळा रेटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणासह मंजुरीसाठी जलसंपदा मंत्री राधेकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली असून या कामाबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन पुढील कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले असल्याची माहिती आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली नागपूर येथे सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन चालू आहे या अधिवेशनाच्या आमदार नारायण आबा पाटील यांनी करमाळा मतदार संघातील अनेक प्रलंबित प्रश्न सादर केले असल्याची समजते. आज त्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रत्यक्षात भेट घेतली व चर्चा करून थेटेवाडी उपसा बाबत निवेदन दिले.

याबाबत अधिक माहिती देताना आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले की नियोजित रेटेवाडी उपकार सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचा मार्ग मोकळा झाला असला तरी आर्थिक तरतूद व पुढील कार्यवाहीसाठी कार्यालयीन स्तरावरून विलंब होत असल्याचे आपण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमोर मांडले व कुकडी कालवा सल्लागार समितीच्या अहिल्यानगर येथे झालेल्या बैठकीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना काम तातडीने करावे अशा सूचना दिल्या होत्या व नियोजित रेटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या कामाबाबत आपण अविरतपणे पाठपुरावा चालू ठेवला



असून आज सभागृहात या विषयावर औचित्यपूर्ण मुद्दा मांडण्यात लेखी निवेदन दिले होते परंतु मंजुरी घेण्यात येणाऱ्या विरोधकाची संख्या जास्त असल्याने व नियम २९३ अन्वये आणखी काही सदस्य बोलणे बाकी असल्याने आजचे औचित्यपूर्ण मुद्दे स्थगित करण्यात आले आहेत परंतु तरीही आपण आज उशिरा अथवा उद्या नियोजित रेटेवाडी उपटा सिंचन योजनेच्या विषयावर सभागृहात बोलण्यासाठी परवानगी मिळाली पाहिजे यासाठी प्रयत्नशील आहोत जेणेकरून नियोजित रेटेवाडी उपसा सिंचन योजनेच्या पुढील कामाची गती मिळेल आज आपण जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समस्येच्या विषय मांडून करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी नियोजित रेटेवाडी उपसा सिंचन योजनेची किती महत्त्वाचे आहे याची बाजू मांडली आहे तसेच काळातच या विषयाबाबत एक बैठकीची मागणी ही आपण केली असल्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले.

### एट्रोसिटी अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची परिवाराकडून मागणी

# पुणे येथे जातीवादाचा आणखी एक बळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/ राहुल बनसोडे प्रतिनिधी : शिक्षणाची माहेर घर म्हणून मिरवून घेणारी पुणे मध्ये मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली आहे.एका बौद्ध तरुणाला त्याची नाव व जात विचारून जीव जाई पर्यंत मारहाण करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भीमसैनिक सचिन धोंडीबा सोनकांबळे (रा.दापशेड ता.लोहा जिल्हा. नांदेड, सध्या राहणार मानकर चौक, वाकड.) हा बौद्ध तरुण पुण्यात लक्ष्मी ट्रॅव्हल्स वर ड्रायवर म्हणून कार्यरत होता.






दिनांक २८/११/२०२५ रोजी पुणे हून जयपूर ची लक्झरी बस घेऊन जात असताना त्याला मानकर चौक,वाकड येथे फीट आल्या कारणाने गाडी बाजूला लावत असताना पाठीमागून येणारी कार ने बसला धडक दिली. त्यात सचिन सोनकांबळेला मारहाण करून त्याची काहीच चूक नसताना त्याच्याकडून रोख रक्कम ४०००० रुपये वसूल केले गेले.तेवढ्यावरच न थांबता जातीयवादी मानसिकतेने मस्तावलेल्या अजिंक्य भोसले आणि त्याच्या अन्य साथीदाराने सचिन सोनकांबळे याला जबरदस्तीने गाडीत बसवून नाव आणि जात विचारून, त्याच्या जवळचा मोबाईल घेऊन, त्यामध्ये भीमा कोरेगाव येथे अभिवादन करतानाचा फोटो पाहून भोसले कुटुंबाकडून तब्बल पाच ते सहा तास अमानुषपणे बेदम मारहाण करून बेवारस अवस्थेत लक्ष्मी ट्रॅव्हल च्या पार्किंग मध्ये टाकून देण्यात आला. ट्रॅव्हल च्या मालकाने शोध घेतली असता तो पार्किंग मध्ये बेवारस अस्वस्थेत आढळून आल्यानंतर त्याला दिनांक ३०/११/२०२५ रोजी ससून रुग्णालयात उपचार करिता दाखल करण्यात आले. त्यात तो कोमात जाऊन दिनांक ११/१२/२०२५ रोजी त्याने जीव सोडला.याबाबत पोलिस प्रशासना कडून गुन्हा नोंद करून घेण्याची टाळाटाळ करण्यात येत आहे असे सचिन सोनकांबळे यांच्या परिवार कडून सांगण्यात आले.

# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा २०२५

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : शासनाने नेमलेल्या खइझड या संस्थेमार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा २०२५ चे आयोजन ऑनलाईन पध्दतीने २७ मे २०२५ ते ३० मे २०२५ व ०२ जून २०२५ ते ०५ जून २०२५ या कालावधीत राज्यातील २६ जिल्हयांमध्ये एकूण ६० परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने ८ दिवसामध्ये प्रतिदिन तीन सत्रात करण्यात आले होते. या परीक्षेस एकूण २,२८,८०८ परीक्षार्थी उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परीक्षेस एकूण २,११,३०८ प्रविष्ठ झाले होते.

या परीक्षेचा निकाल १८ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. तद्नंतर बी.एड. परीक्षेचे व डी.एल.एड. परीक्षेचे शिरी म्हणून ज्या विदयार्थी,उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. त्या विदयार्थी उमेदवारांना शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटि-१, ०२ मे २०२५ अन्वये उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत सादर करणे अनिवार्य होते.

त्यानुसार या कार्यालयाचे प्रसिध्दी निवेदन ०९ सप्टेंबर २०२५ अन्वये ज्या विदयार्थी, उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उतीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र व्यावसायिक परीक्षा उतीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल महिना कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयास सादर करणेबाबत दि. १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती. तद्नंतरही ज्या विदयार्थी उमेदवारांनी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले नाही अशा २५३७ विद्यार्थी , उमेदवारांना २० सप्टेंबर २०२५ रोजी डचड द्वारे उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र सादर करणेसाठी २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली होती.

तरी २५३७ विद्यार्थी व उमेदवारां पैकी २२०७ विद्यार्थी, उमेदवारांनी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर न केल्याने निकाल राखीव ठेवण्यात आलेल्या २२०७ विद्यार्थी उमेदवारांचा निकाल रद्द करण्यात येत आहे. या विद्यार्थी, उमेदवारांची यादी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscep-une.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. तथापि याबाबतीत आलेल्या कोणत्याही प्रकारच्या विनंतीचा विचार सद्यःस्थितीत केला जाणार नाही असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### बीएसएस सोनाटा मायक्रोक्रेडिट लिमिटेडच्या सामाजिक जबाबदारीतून नवा उपक्रम

# गायींच्या आरोग्य तपासणीसाठी अत्याधुनिक व्यवस्थापन प्रणालीची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : पशुधन विकासाला तांत्रिक आणि आधुनिक दिशा देण्यासाठी बीएसएस सोनाटा मायक्रोक्रेडिट लिमिटेड यांच्या सामाजिक जबाबदारीतून राबविण्यात येणाऱ्या पशुधन विकास कार्यक्रमांतर्गत गायींच्या आरोग्य तपासणीसाठी अत्याधुनिक गाय आरोग्य तपासणी प्रणाली बसविण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील माळकरंजा व सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील अंधळगाव येथे एकूण २० गायींना हे उपकरण यशस्वीरित्या बसवण्यात आले.

या तंत्रज्ञानाद्वारे गायींचे शरीर तापमान, हृदयाचे ठोके, हालचालींचे निरीक्षण, उष्णतेची स्थिती, आजाराची प्रारंभिक चिन्हे यांसारखी महत्त्वाची माहिती थेट मोबाईल प वर मिळणार आहे. त्यामुळे पशुपालकांना गायींचे आरोग्य व्यवस्थापन त्वरित आणि अधिक प्रभावी पद्धतीने करता येणार आहे.

**वैज्ञानिक पशुपालनाचा नवा टप्पा**

बायफ लाइव्हलीहुड्सच्या वतीने हा उपक्रम ग्रामीण भागात राबवण्यात आला आहे. बायफचे अधिकारी डॉ. एकशिंगे संतोष यांनी सांगितले की, पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शनानुसार माळकरंजा आणि अंधळगाव येथील पशुपालक सौ. रेशमा चंद्रकांत वाघमारे आणि सौ. सुजाता सचिन माळी यांच्या मिळून २० एचएफ गायींमध्ये हे अत्याधुनिक उपकरण बसवण्यात आले आहे. हे उपकरण गायींचे आरोग्य, पुनरुत्पादन आणि पोषण व्यवस्थापन सुधारण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

गायचे आरोग्य तपासणीत प्रणाली उपकरणाचे प्रमुख फायदे :

१. आरोग्य निरीक्षण: शरीर तापमान, हृदय गती आणि हालचालींचे अचूक मोजमाप २. प्रजनन व्यवस्थापन: योग्य वेळी उष्णता ओळखून कृत्रिम गर्भाधान सुलभ ३. आहार विश्लेषण: आहारातील बदल आणि समस्या आधीच ओळखणे ४. लोकेशन ट्रॅकिंग: गायींच्या हालचालींची अचूक माहिती ५. डेटा विश्लेषण: दूध उत्पादन आणि एकूण व्यवस्थापनात सुधारणा

या उपक्रमाच्या स्थापनेसाठी बायफ लाइव्हलीहुड्स धाराशिवतर्फे डॉ. एकशिंगे संतोष, अतुल मुळे, संताजी मिसाळ आणि रामचंद्र गडहिरे यांनी भेट देऊन संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. त्यांनी स्थानिक पशुपालकांशी संवाद साधत या तंत्रज्ञानाचे फायदे आणि उपयुक्तता समजावून सांगितली.



पशुपालकांनी हा उपक्रम वैज्ञानिक पशुपालनासाठीचे मोठे पाऊल असल्याचे सांगत समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, या उपकरणामुळे गायींचे आरोग्य आणि पुनरुत्पादन व्यवस्थापन नक्कीच सुधारेल.

अतुल मुळे यांनी सांगितले की, धाराशिव जिल्यात राबविण्यात आलेला हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरेल. पशुपालनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) वापरून पशुपालकांचे शाश्वत जीवनमान उंचावण्यासाठी बायफचे प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वीही देवळली येथे असाच उपक्रम राबवून पशुपालकांना त्याचा मोठा फायदा झाला आहे.

हा उपक्रम पशुसंवर्धनातील तांत्रिक प्रगती आणि ग्रामीण विकासाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे.

# इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमुळे एस. टी. महामंडळाचे होतेय दररोज कोट्यवधीचे आर्थिक नुकसान

## जुने आणि नादुरुस्त डिझेल पंपांचा पुरवठा मुळे एस टी ची वाहतूक कोलमडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
महेश गायकवाड

सोलापूर : राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभागातील एसटी आगारांना इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने चक्क नादुरुस आणि जुने व मोडकळीस आलेल्या डिझेल पंपांचा पुरवठा केला असल्यामुळे एस टी आगारातील डिझेल पंप दररोज वारंवार बंद पडून एस टी महामंडळाचे सोलापूर विभागाचे कोट्यवधीचे नुकसान होत आहे. यामुळे ग्रामीण भागातील एस टी महामंडळाचे वाह-तूक कोलमडली असून मोठ्या प्रमाणात फेऱ्या रद्द होत आहेत. या कडे इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने जाणून बुजून दुर्लक्ष करत आहे. एस टी महामंडळाकडून डिझेल साठी पैसे भरण्यास तास अर्धा तास उशीर झाला तर हेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशन

**एस टी महामंडळाचे आर्थिक नुकसान करण्यासाठी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने वारंवार बंद पडणारे आणि जुने डिझेल पंप एस टी महामंडळाच्या सोलापूर आगारातील सर्व डेपो ला पुरविले आहेत या सर्व डेपो मधील डिझेल पंप वारंवाट बंद पडून एस टी महामंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे यास केवळ इंडियन ऑईल कॉर्पोरेशन हेच जबाबदार आहे. एस टी महामंडळाच्या सोलापूर विभागातील सर्व डेपो मधील डिझेल पंप सध्या बंद पडले असून एस टी महामंडळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे यास केवळ आणि केवळ इंडियन ऑईल कॉर्पोरेशन हेच जबाबदार आहे**

**– असंख्य एस टी कामगार**
**सोलापूर विभाग**

एस टी महामंडळाचे डिझेल रोखून धरते अडवून ठेवते आता सोलापुर विभागातील इंडियन ऑईल कॉर्पोरेशन चे अनेक पंप वारंवार बंद पडले असून या मुळे एस टी महामंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान दररोज होत आहे वारंवार डिझेल पंप बंद पडत असल्यामुळे दररोज एस टी महामंडळाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत आहे. डिझेल नसल्यामुळे फेऱ्या रद्द होत आहेत. ग्रामीण भागातील जनतेला मोठा त्रास सहन सहन करावा लागत आहे हा प्रकार गेल्या एक वर्षांपासून सुरू असून याबाबत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कडे एस टी महामंडळाचे अधिकारी

**गेल्या एक वर्षांपासून वारंवार डिझेल पंप बंद पडण्याचे प्रकार सोलापूर विभागातील सर्व आगारात सुरू असून याबाबत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कडे एस टी महामंडळाचे अधिकारी तसेच दक्षता पथकाचे अधिकारी आणि त्या त्या डेपो चे आगार व्यवस्थापक यांनी वारंवार आणि अनेक वेळा कागदोपत्री कळवून पत्रव्यवहार ही केले आहेत परंतु या अधिकाऱ्यांनी केलेल्या पत्र व्यवहारास आणि डिझेल पंप बंद असल्या बाबत च्या केलेल्या तक्रारीस इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने केराची टोपली दाखवली आहे.**








दक्षता पथकाचे अधिकारी आणि त्या त्या डेपो चे आगार व्यवस्थापक यांनी वारंवार आणि अनेक वेळा कागदोपत्री कळवून पत्रव्यवहार ही केले आहेत. परंतु या अधिकाऱ्यांनी केलेल्या पत्र व्यवहारास आणि डिझेल पंप बंद असल्या बाबत च्या केलेल्या तक्रारीस इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने केराची टोपली दाखवली आहे.

एस टी महामंडळास पुरविलेल्या पंढरपूर मंगळवेढा कुर्डुवाडी सांगोला अक्कलकोट बार्शी येथील डिझेल पंप सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशन च्या हलगर्जीपणामुळे सध्या बंद पडले आहेत.

याचा परिणाम एस टी महामंडळाच्या ग्रामीण भागातील फेऱ्या रद्द होऊन आर्थिक नुकसान करणारे आणि जनतेची गैरसोय करणारे होत आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने जाणून बुजून एस टी महामंडळाच्या सर्व आगाराला नादुरुस्त आणि जुने व मुदत संपलेले आणि जीर्ण झालेले व मोडकळीस आलेले डिझेल पंप पुरविले आहेत या नादुरुस्त डिझेल पंपांमुळे चालकांना त्यांच्या नियोजित फेऱ्या करणे अवघड जात आहे. यामुळे आगाराच्या उत्पन्नावर तसेच आगाराच्या दैनंदिन के पी टी एल वर आणि चालकाच्या के पी टी एल वर आणि के एम पी एल वर परिणाम होत आहे.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ने मुद्दाम एस टी महामंडळास बंद पडके जुने आणि नादुरुस्त पंप पुरविले आहेत एस टी महामंडळाचे आर्थिक नुकसान करून खाजगी वाहनांस लाभ करून देण्यासाठी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ची खाजगी वाहन आणि डिझेल पंप धारकांची मिलीभगत असावी अशी शंका अनेक एस टी कामगारांनी बोलून दाखवली.

# पंढरपूर ते तिरुपती आजपासून नवी रेल्वे सुरू; विठ्ठलाच्या दर्शनानंतर आता थेट तिरुपतीला बालाजीचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अनेक वर्षापासून ची मागणी आज पूर्ण झाली असल्याचे समाधान रेल्वे सल्लागार समितीच्या सदस्यांनी व्यक्त केली आहे. विठ्ठल दर्शनानंतर लगेच बालाजी दर्शन असा योग या नवीन पंढरपूर तिरुपती पंढरपूर रेल्वेच्या माध्यमातून नागरिकांना भाविकांना भक्तांना मिळणार आहे.

पंढरपूर वरून लातूर मार्गे तिरुपती ला जाण्यासाठी साप्ताहिक रेल्वे आज शनिवार दिनांक १३ पासून सुरू होत आहे. विठ्ठलाच्या दर्शनानंतर आता थेट तिरुपतीच्या बालाजीच्या दर्शनासाठी भाविकांना जाता येणार आहे. व पंढरपूर तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूर मार्गे सुरू करण्यात नुकतीच मंजुरी दिली आहे दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ आणि ०७०१३ क्रमांकाची रेल्वे सेवा लातूर मार्गावरून पंढरपूर तिरुपती सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. प्रशासनाच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्चित केली जाणार आहे ही सुविधा तूर्तास १३ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरू राहणार आहे.

गाडी क्रमांक ०७०१२ ही १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ४:४० मिनिटांनी तिरुपती येथून सुटेल व ही गाडी काचीगुडा, सिकंदराबाद, बिदर लातूर बार्शी कुर्डूवाडी मार्गे दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी तारीख १४ सायंकाळी सहा वाजून पन्नास मिनिटांनी पंढरपूर ०७०१३ दर रविवारी १२.१० लातूर रेल्वे स्थानकावर पोहोचले दुसऱ्या दिवशी सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहो-चेल या गाडीला एक वाताने कोणी प्रथमवर्ग एक वातानुकूलित स्पष्ट कम टू टीआर दोन वातानुकूलित सहा वातानुकूलित श्री टीआर ९ शामियाना दोन द्वितीय श्रेणी व काम दिव्यांग असेल आर असे एकूण २३ डबे असणार आहेत अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

# मंदिर समितीच्या वतीने विष्णुपद येथे वनभोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका वफाळपूर येथील श्री विष्णुपद मंदिर, येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने भोजनाची मार्गशीष महिन्यात गोपाळपूर जवळील श्रीविष्णूपन मंदिरे येथे भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने येथे मन मोजण्याची व्यवस्था केलेली होती. सुमारे पाच ते सहा हजार भाविकांनी या वनभोजनाचा लाभ घेतला आहे. या ठिकाणी मंदिराला आकर्षक रोषणाई करण्यात आलेली होती. येथे बॅरिगेटिंग व सुरक्षारक्षकाची व्यवस्था केलेली आहे.

येथे नगरपालिका व मंदिर समितीकडून स्वच्छतेची मोहीम करण्यात आली आहे. मंगळवारी बारा ते चार या वेळेत भाविकांनी वनमजनाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतलेला आहे. या कार्यक्रमाप्रसंगी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र शेळके, तसेच मंदिर समितीचे सदस्य ह. भ .प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, अँड माधवी निगडे, मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक श्री पृथ्वीराज राऊत, अन्नछत्र विभाग प्रमुख विनोद पाटील, परिवार व देवता विभाग प्रमुख अतुल बक्षी, अनंता रोपळकर, प्रकाश पाटील राजेंद्र सुभेदार, नागेश नागटिळक, राजू घागरे, शुभम राऊत, रमेश गोडसे, संजय कोकीळ सु-धीर घोडके, सावता हजारे, यासंबंधी समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

# डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांना 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : बाबू जगजीवन राम कला,संस्कृती तथा साहित्य अकादमीच्या वतीने दिला जाणारा देशातील प्रतिष्ठित 'महात्मा ज्योतिबा फुले नॅशनल सन्मानपदक' यंदा डॉ.नंदकुमार मारुती जाधव यांना प्रदान करण्यात येणार आहे. राजधानी दिल्ली येथे लवकरच होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्यात हा गौरव समारंभ पार पडणार आहे. डॉ.जाधव यांनी गेली अनेक वर्षे शैक्षणिक, सामाजिक आणि विशेषतः बौद्धिक अक्षम मुलांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा अनेक मुलांचे आयुष्य घडविण्यासाठी सातत्याने काम करत आहे. शिक्षणासोबतच क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम,स्वावलंबन प्रशिक्षण आणि समाजामध्ये जागृती निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. या उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेऊन अकादमीने त्यांना हा मानाचा सन्मान जाहीर केला आहे. विशेष मुलांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी



केलेल्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असल्याचे अकादमीने नमूद केले आहे. हा तिसरा राष्ट्रीय पुरस्कार आहे या अग-ोदर त्यांना भारत माता राष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार - केंद्रीय सरकार मिळाला असून मिळणाऱ्या या सन्मानामुळे विशेष शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठी प्रेरणा मिळणार असून, डॉ.जाधव यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक - २०२५ च्या अनुषंगाने मतदानाचे दिवशी सर्व मतदान केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ नुसार ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. त्याअनुषंगाने नगरपरिषद , नगरपंचायतींचे २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुक २०२५ ची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पारपाडण्याच्या दृष्टीकोनातुन सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात २० डिसेंबर २०२५ रोजी होणा-या मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी मतदारांव्यतिरिक्त मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघामध्ये प्रवेश करण्यास निर्बंध घालणे आवश्यक आहे. आणि सर्व संबंधीतांना नोटीस देवुन त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ नुसार एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे.

जिल्हादंडाधिकारी, सोला-पूर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहित्ता-२०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन नगरपरिषद, नगरपंचायती निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन सोलापूर ग्रामीण जिल्हयात सर्व नगरपरिषद, नगरपंचायती मतदार संघातील दि.२० डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदान केंद्रावर होणाऱ्या सकाळी ०६.०० ते मतदान संपेपर्यंतच्या कालावधीकरिता सर्व मतदान केंद्राचे ठिकाणापासून १०० मीटर परिसरातील सर्व वाणिज्यीक आस्थापना, सर्व मंडपे, दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, चिन्हांचे प्रदर्शन करण्यास निवडणुक प्रक्रियेत भाग घेणारे शासकीय व्यक्ती व त्यांचे वाहनांव्यतीरिक्त इतर व्यक्तीस अथवा खाजगी वाहन प्रवेश करण्यास याव्दारे प्रतिबंध करण्यात येत आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ प्रमाणे दंडनीय कार्यवाहीस पात्र राह-तील असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री-ग्रामविकास मंत्र्यांचा शब्द; सांगोला पंचायत समितीच्या नूतन प्रशासकीय इमारतीसाठी मिळणार निधी**

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्याकडून ग्रामीण विकासासाठी मोठे पाऊल; पंचायत समितीच्या नूतन प्रशासकीय इमारतीसाठी अधिवेशनात १५ कोटींची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : राज्य विधिमंडळाचे नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात सांगोला पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी १५ कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी नागपूर येथील विधानसभा अधिवेशनात केली.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, सांगोला पंचायत समितीची सध्याची प्रशासकीय इमारत जीर्ण अवस्थेत असून ती आजच्या प्रशासकीय गरजांसाठी पूर्णपणे अपुरी ठरत आहे. कार्यालयीन जागेअभावी विविध विभागांची कामे विखुरलेल्या पद्धतीने सुरू आहेत. याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणाऱ्या सेवा, विकास योजनांची अंमलबजावणी तसेच प्रशासकीय कार्यक्षमतेवर होत आहे. सांगोला तालुका हा दुष्काळी परिस्थितीला सातत्याने सामोरा जाणारा, शेतीप्रधान आणि भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण तालुका आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध राज्य व केंद्र शासनाच्या योजना, रोजगार हमी, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, कृषी तसेच ग्रामीण पायाभूत सुविधांच्या योजनांची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र, अद्ययावत सुविधा नसलेल्या इमारतीमुळे कर्मचारी व अधिकारी यांना कामकाज करताना अनेक अडथळे येत आहेत, असे त्यांनी अधोरेखित केले. नवीन प्रशासकीय इमारत ही आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज, प्रशस्त सभागृह, स्वतंत्र विभागीय कार्यालये, नागरिकांसाठी प्रतीक्षालय, दिव्यांगांसाठी सोयी, पार्किंग व्यवस्था तसेच डिजिटल सेवा केंद्र यांसह उभारण्यात यावी, अशी अपेक्षा आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केली. यामुळे एकाच

## मुख्यमंत्री-ग्रामविकास मंत्र्यांचा शब्द; सांगोला पंचायत समिती इमारतीसाठी १५ कोटी लवकरच

**अधिवेशनादरम्यान सांगोला पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी १५ कोटी रुपयांच्या निधीबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली.आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे शब्द दिला आहे. शासन स्तरावर तातडीने प्रक्रिया पूर्ण करून सांगोला पंचायत समिती इमारतीच्या कामाला गती दिली जाणार आहे.**

छताखाली सर्व प्रशासकीय सेवा उपलब्ध होऊन नागरिकांची कामे जलद, पारदर्शक व सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले. यासंदर्भात शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा व आगामी अर्थसंकल्पात सांगोला पंचायत समिती प्रशासकीय इमारतीसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी ठाम मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी संबंधित मंत्री महोदयांकडे केली. या मागणीला सभागृहात गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, निधी मंजूर झाल्यास सांगोला तालुक्याच्या ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळेल तसेच नागरिकांना अधिक सक्षम व कार्यक्षम प्रशासकीय सेवा मिळतील, असा विश्वास आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केला.